# असुनी नाथ आम्ही अनाथ

## असंघटित कामगारांना सरकार दिलासा देणार

विकसनशील देशांमध्े औद्योगिक प्रगति हाच विकासाचा पाया असल्याने औद्योगिक प्रगतिचा केंद्रबिंदू असलेल्या कामगारांच्या सर्वांगीण उत्कर्षाची जबाबदारी ही स्वाभाविकपणे शासनाला स्वीकारावी लागते जबाबदारीच्या ह्याच भावनेतून औद्योगिक द्रृष्ट्या अग्रेसर महाराष्ट्राने कल्याणकारी राज्य ही संकल्पना राबविण्यामधेही आघाडी घेऊन आदर्श निर्माण केला राज्याने अंमलात आणलेल्या कल्याणकारी योजनांचे अनुकरण पुढे विविध राज्यांनी व केंद्रानेही केले महाराष्ट्रामधे १९७२ साली सुरू करण्यात आलेली रोजगार हमी योजना हे ह्याचेच एक उदाहरण विकसनशील जगतातील सर्वात मोठा व प्रदीर्घ काळ सुरू असलेला जनहिताचा कार्यक्रम अशा शब्दांमधे ह्या योजनेची नोंद संयुक्त राष्ट्र संघाने घेतली जगातील सर्वात मोठा कल्याणकारी कार्यक्रम म्हणून संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने २००६ साली सुरू महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही महाराष्ट्र राज्याच्या योजनेपासून प्रेरणा घेऊनच आखलेली आहे परंतु आज मात्र ज्या राज्याने देशातील इतर राज्यांसमोर आदर्श निर्माण करणे अपेक्षित आहे ते महाराष्ट्र राज्य असंघटित क्षेत्रातील कामगारांकरिता कल्याणकारी योजना राबविण्यामधे मागे रहात आहे

देशातील असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या सुमारे ४० कोटी आहे म्हणजेच कष्टकऱ्यांपैकी ९३ कामगार हे असंघटित क्षेत्रामधे काम करतात महाराष्ट्र राज्यामधे असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या ४ कोटीच्या आसपास आहे राज्यातील कामगारांच्या संख्येपैकी ८८ ०२ कामगार असंघटित क्षेत्रामधे काम करतात सुरक्षा रक्षक माथाडी कामगार व हमाल बांधकाम कामगार घरेलू कामगार आदिना सामाजिक सुरक्षितता देण्यासाठी व त्याच्याकरिता कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यासाठी विविध मंडळांची स्थापना महाराष्ट्र राज्यामधे झाली परंतु असंघटित कामगारांपैकी कितीना ह्या मंडळांच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षा लाभली वा कल्याणकारी उपक्रमांचा लाभ पोहोचला हा संशोधनाचा विषय आहे अनेक आस्थापनांमधून सहकारी गृहनिर्माण संस्थातूनच नव्हे तर बँकांसह अनेक सरकारी उपक्रमांमधे काम करणारे सुरक्षा रक्षक भविष्य निर्वाह निधी कामगार विमा योजना सोडाच परंतु राज्य सुरक्षा मंडळाने निश्चित केलेल्या किमान वेतनापासूनही वंचित आहेत ह्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना १२ तास काम करावे लागते कल्याणकारी सुविधा तर दूरच गणवेषाचे व बुटांचे पैसेही नोकरीवर रुजू होण्यापूर्वीच सुरक्षा पुरविणाऱ्या ठेकेदाराना आगाऊ द्यावे लागतात बंद पडलेल्या गिरण्या कारखान्यातील बेरोजगार कामगारांना वा स्थलांतरित कामगारांना अशा स्वरूपातील नोकरीचा आधार हा बुडत्याला काडीचा आधार ठरतो व तोंड मिटून बुक्क्यांचा मार सहन करण्याशिवाय पर्याय रहात नाही जी फोर व मॉनीट्रॉन सारख्या सुरक्षा रक्षक पुरविणाऱ्या कंपन्या देखिल सुरक्षा रक्षकांचे शोषण करण्यात आघाडीवर रहातात सुरक्षा रक्षक मंडळ डोळयावर कातडे ओढून हे सारे निर्विकारपणे पहात रहाते जे सुरक्षा रक्षकांचे तेच बांधकाम कामगारांचे

शहरी क्षेत्रामधे बांधकामाचे पेव फुटले असताना हजारोनी कामगारांचे पाय पोट भरण्यासाठी शहराकडे वळत आहेत अत्यंत असुरक्षितता व हलाखीचे जिणे वाट्याला येत असलेला हा असंघटित क्षेत्रातील मोठा वर्ग आहे राज्यातील सुमारे २५ लाख बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षितता व कल्याणकारी सुविधा पुरविण्यासाठी बांधकाम कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यांत आली अद्यापपर्यंत एकूण बांधकाम कामगारांपैकी १० कामगारांचीही नोंदणी ह्या मंडळाकडे झालेली नाही व नोंदणी करण्यासाठी ९० दिवस काम केल्याचा दाखला देण्याचा अधिकार मालकांना दिल्याने बांधकाम कामगाराची नोंदणी होणे दुरापास्त होत आहे तथापि बांधकाम क्षेत्रावर लावलेल्या विकासकांकडून मंडळाला मिळणाऱ्या बांधकाम खर्चाच्या एक टक्का सेस मुळे सुमारे १५०० कोटी रूपयांचा निधी पडून आहे ह्या निधीचा योग्य विनियोग करून बांधकाम कामगारांना कल्याणकारी सुविधा देण्याची कोणतीही योजना बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे नाही परिणामी मंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीपैकी बांधकाम कामगारांसाठी केवळ काही लाखच खर्च झाल्याने कोट्यावधींचा निधी आहे परंतु बांधकाम कामगारांचे कल्याण करण्याची इच्छा शक्ती नसल्याने कामगार मात्र उपेक्षित असल्याचे चित्र आहे असंघटित क्षेत्रातील दुसरा मोठा वर्ग म्हणजे घर कामगार म्हणजेच घरगडी वा मोलकरीण या वर्गामधे ८० महिला कामगार असल्याने घरकामगारांच्या कल्याणकारी सुविधांकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे परंतु मुलभूत अधिकारांपासून वंचित अशा ह्या वर्गातील कामगाराना सन्मानाने जीवन जगण्यासाठी प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा कोणताही ठोस कार्यक्रम शासनासमोर असल्याचे दिसून येत नाही मुळातच शासन ह्या साठी काही प्रयत्न करत

आहे ह्याची जाणीव वा माहीतीही घरकामगारांपैकी बहुसंख्यांना नाही कारण हे प्रयत्नच त्यांच्यापर्यंत पोहोचलेले नाहीत फेरीवाले व रस्त्यावरील विक्रेते टॅक्सी व रिक्षा चालक खाजगी वाहन चालक उपाहारगृह कॅन्टीन भोजन कंत्राटदार समारंभांमधे सजावटीची कामे घेणारे कंत्राटदार आदिंकडे कामे करणारे कामगार रिटेल दुकाने ते मॉल पर्यंत काम करणारे कष्टकरी सफाई कर्मचारी यांना असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायद्याच्या कक्षेत आणून सामाजिक सुरक्षा देण्यासाठी २००८ साली कायदा संमत झाला असला तरी आजमितीपर्यंत ह्या कायद्याची अंमल बजावणी प्रभावीपणे व्हावी या करिता यंत्रणा ऊभी करण्यात अक्षम्य दिरंगाई नोकरशहांकडून करण्यांत येत आहे परिणामी केंद्र सरकारच्या असंघटित कामगार हिताच्या धोरणाला हरताळ फासण्याचे काम जे राज्य नेहमीच सामान्यांच्या दुर्लक्षिलेल्यांच्या हितासाठी ठाम भूमिका घेण्यामधे आघाडीवर राहीले त्या महाराष्ट्र राज्यामधे केले जात आहे हे दुर्दैवी आहे पुरोगामी व जनहिताचे अनेक कार्यक्रम यशस्वीपणे राबवून देशासमोरच नव्हे तर जगासमोरही आदर्श निर्माण करणार्या महाराष्ट्राला हे मान खाली घालावयास लावणारे आहे म्हणूनच आम आदमी के साथ
असल्याचा दावा करणाऱ्यांच्या सरकारने ही परिस्थिती बदलून असंघटित कामगारांना जे सामान्यातले अति सामान्य आहेत त्यांना त्यांच्या भवितव्याच्या सुरक्षेची हमी देणारा सामाजिक सुरक्षा कार्यक्रम प्राधान्याने हाती घ्यावयास हवा त्यांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वत ला व समाजालाही ते ह्या देशाचा सुजाण व जबाबदार नागरिक असल्याचा विश्वास निर्माण करणारी विशेष असंघटित कामगारांसाठीची कामगार कल्याण योजना ही काळाची गरज आहे हे ओळखून पावले उचलावयास

हवी २००८ साली असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षेची हक्क देणारा असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा २००८ हा कायदा करण्यांत आला ह्या कायद्यानुसार राज्य सरकारने असंघटित कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधी अपघात नुक़सान भरपाई वृध्दापकाळ सुरक्षा गृहनिर्माण मुलांकरिता शैक्षणिक योजना कामगारांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम वृध्दाश्रम आदिंसह कल्याणकारी योजना आखणे आवश्यक आहे राज्य शासनाला असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी योग्य योजना आखण्यास शिफारशी करणे ह्या कायद्याच्या अंमलबजावणी संबंधी सूचना करणे असंघटित कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजनांचे नियंत्रण करणे व त्या वर होणाऱ्या खर्चाचा आढावा घेणे आदि साठी राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करावयाचे आहे परंतु केंद्रामधे हा कायदा करण्यामधे पुढाकार घेणाऱ्या काँग्रेस पक्षाचेच सरकार महाराष्ट्र राज्यामधेही असताना व कायदा होऊन ५ वर्षें होत असतानाही असे मंडळ स्थापन होत नाही हे पुरोगामी महाराष्ट्राच्या लौकिकाला साजेसे नाही

एकूण कामगारांच्या ९० पेक्षा जास्त संख्येने असलेल्या असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा व कामगार कल्याण सुविधा पुरविण्यासाठी यंत्रणा उभे करणे हे काम वेळकाढू व जिकिरीचे आहे हे खरेच परंतु सध्या प्रामुख्याने संघटित कामगारांसाठी कार्यरत यंत्रणांच्या कार्यपध्दतीमधे योग्य बदल करून व त्यासाठी संबंधित कायद्यामधे आवश्यक बदल वा सुधारणा करून या यंत्रणांचा उपयोग या कामी करता येऊ शकेल महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ह्या विशेष करून संघटित कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविणाऱ्या मुंबई कामगार कल्याण निधी कायदा १९५३ न्वये

स्थापन झालेल्या मंडळावर ही जबाबदारी सोपवता येणे शक्य आहे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या गेल्या ६० वर्षाच्या वाटचालीवर द्रृष्टीक्षेप टाकला तरी राज्यातील संघटित कामगारांच्या जीवनामधे या मंडळाने घडवून आणलेल्या सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाची खात्री पटते कामगाराची सर्वांगीण प्रगति हे ध्येय समोर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ गेली ६० वर्षे कार्यरत आहे देशाच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीचा पाया घालण्याम आपल्या श्रमांचे मोलाचे योगदान देणाऱ्या कामगाराला स्वत च्या प्रगतीच्या सुवर्ण संधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न ह्या मंडळामार्फत सतत करण्यात आले ह्या प्रयत्नांचा भाग म्हणून विविध सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक व क्रीडाविषयक उपक्रम अव्याहतपणे राबविण्यांत येत आहेत ह्या उपक्रमांमुळेच कामगारांतून नावारूपांस आलेले असंख्य क्रीडापटू साहित्यिक नाट्य व चित्रपट कलावंत सामाजिक कार्यकर्ते व राजकीय नेतेही आपआपल्या क्षेत्रामधे स्वयंतेजाने तळपताना दिसतात मोहन जोशी रमेश भाटकर निर्मिती सावंत हे नाट्य व चित्रपट कलावंत शाहीर साबळे दशावतारी कलावंत बाबी नालंग टेबल टेनिसपटू महेंद्र चिपळूणकर कॅरमपटू अरूण केदारनाथ संगीता चांदोरकर शरीर सौष्ठवपटू विजू पेणकर क्रिकेटपटू रामनाथ पारकर चंद्रकांत पंडित पॉवर लिफ्टींग मधील मधुकर दरेकर यांच्यासह कामगार नेते दत्ताजी साळवी आमदार बाळा नांदगांवकर व देशाचे विद्यमान गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे अशा अनेक कर्तबगार व्यक्तीमत्वांच्या जडणघडणीमधे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा सिंहाचा वाटा आहे महाराष्ट्राला गौरवास्पद वाटावी अशी कामगिरी करणार्या ह्या मंडळाची स्थिती आता दिवसेंदिवस खालावते आहें असे वाटावे अशी स्थिती निर्माण होत आहे जागतिकीकरणानंतर बंद

पडलेल्या गिरण्या  कारखाने आधुनिकीकरणाच्या योजना कायदा धाब्यावर बसवून अनिर्बंध्दपणे केवळ खाजगीच नव्हे तर सार्वजनिक उद्योगातही अवलंबिलेली कंत्राटी कामगार प्रथा संघटित क्षेत्रातील कामगारांवर बेकारीचे संकट ओढवले परिणामी पोटाची खळगी भरण्यासाठी असंघटित क्षेत्रमधील मिळेल तो रोजगार पत्करण्याची वेळ कामगारांवर येऊन ठेपली  याचाच परिणाम महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कारभारावरही झाला  आर्थिक निधीमधे घट झाली  वर्गणीदार सभासदांच्या संख्येत घट झाल्याने उपक्रमातल्या सहभागावर विपरीत परिणाम झाला व कर्मचाऱ्यांच्या उत्साहालाही ओहोटी लागली  मंडळाच्या कर्मचारी भरतीमधे राजकीय नेत्यांना रस वाटू लागल्याने  शासनाच्याच महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेतून कामगार कल्याण विषयक प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांची भरती करावयाचे टाळून खोगीरभरती करण्याचे धोरण स्वीकारले गेले  आज ह्या मंडळाची राज्यभरामधे  २३२ कामगार कल्याण केंद्रे आहेत  बदलती परिस्थिती लक्षात घेऊन  असंघटित कामगारांसाठी  सामाजिक सुरक्षा व कल्याण केंद्रे म्हणून ह्या केंद्रांचा तसेच  महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या पायाभूत सुविधांचा उपयोग करणे शक्य आहे परंतु इच्छा शक्ती व कल्पना शक्ती या दोहोंच्या अभावामुळे हे शक्य होत नाही ही वस्तुस्थिती आहे  महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कार्यपध्दतीमधे  असंघटित कामगारांना केंद्रस्थानी ठेवून केलेले कल्याणकारी उपक्रमातील बदल  कर्मचारी वर्गाला  कामगार कल्याण विषयक विशेष प्रशिक्षण  असंघटित कामगारांसाठी  सामाजिक सुरक्षा योजना व हक्क मार्गदर्शन या द्वारे असंघटित कामगारांचे कल्याण करता येईल  कायदे आहेत  योजना आहेत  आर्थिक तरतुदी आहेत परंतु  असुनी नाथ आम्ही

अनाथ अशी स्थिती आहे भविष्यातील असुरक्षिततेचा अंधकारच ज्यांच्या घरांमधे कायमच आहे त्या सामान्यांच्या जीवनामधे प्रगतीच्या संधी देणाऱ्या व संकट प्रसंगी सुरक्षिततेची हमी देणाऱ्या प्रकाशाची दारे राज्य सरकारने आता उशीरा कां होईना उघडावी ह्या दिपावलीच्या शुभेच्छा

अजित सावंत

माजी सरचिटणीस व प्रवक्ता मुंबई काँग्रेस